Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

Original Article

# महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका निवडणुकीत महिलांना ५०% आरक्षण एक सामाजिक न्याय

**प्रा.डॉ. संजय भास्कर तायडे**
ग्रामीण विकास विभाग, श्री.स.ह.केळकर महाविद्यालय, देवगड जि.सिंधुदुर्ग
**Email:** tayadesb.dc@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180130
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(A)
Pp. 150-152
January - 2026
**Submitted:** 17 Dec. 2025
**Revised:** 27 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan. 2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांमध्ये महिलांना ५०% आरक्षण देणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. ७४ व्या घटनादुरुस्तीच्या अंमलबजावणीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. वाढते शहरीकरण, लोकसंख्येचा ताण आणि नागरी सुविधांची गरज लक्षात घेता नगरपरिषद व नगरपंचायतींची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या महाराष्ट्रातील नगरपंचायत व नगरपरिषद निवडणुकांचा अभ्यास करून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच महिलांचा राजकीय सहभाग विश्लेषित करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की ५०% महिला आरक्षणामुळे महिलांचे नेतृत्व, निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि स्थानिक विकासात त्यांची भूमिका अधिक प्रभावी झाली आहे. तसेच सामाजिक समावेशकता, राजकीय सबलीकरण आणि नागरी विकास प्रक्रियेला चालना मिळालेली आहे.*

***मूल शब्द :*** *महिला आरक्षण, नगरपालिका निवडणूक, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक न्याय, महिला सबलीकरण, नगरपरिषद, नगरपंचायत, महाराष्ट्र*

**प्रस्तावना**

भारतात प्राचीन काळापासून शासन व्यवस्था चालत आलेली आहे. या शासन व्यवस्थेत विविध कालखंडांमध्ये बदल झालेले दिसून येतात. लॉर्ड रिपनने १८८२ साली पंचायत राज संबंधीचा कायदा केला. १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० पासून भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. लोकशाही यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्वात महत्त्वाचा निकष म्हणजे मुक्त आणि न्याय निवडणुका होय. निवडणूक मुक्त वातावरणात होण्यासाठी स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद (कलम ३२४) केलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात बहुपक्षीय लोकशाहीचा प्रयोग चाललेला दिसतो. महाराष्ट्र राज्यातील राजकीय पक्षांवर विशिष्ट व्यक्तींचा प्रभाव पडलेला दिसतो. समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र राज्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्त्वाचे स्थान आहे.महाराष्ट्र राज्यात आधुनिकीकरण व औद्योगिकीकरण यामुळे शहरीकरणाचा वेग प्रचंड आहे. महाराष्ट्रातील शहरीकरणाचे प्रमाण हे ४०% आहे. वाढत्या शहरीकरणामुळे निवारा, रस्ते, वीज, आरोग्य, पाणीपुरवठा इत्यादी अनेक समस्या निर्माण होतात. त्यांचे नियमन करण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र, स्वशासन संस्था निर्माण होतात. महाराष्ट्रात नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये झाली आहे. या अधिनियमात ७४ व्या घटनादुरुस्तीने नगरपालिका, नगरपरिषद यांच्यामध्ये ५०% जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतात. वर्ष १९९४ पासून कलम २४३-थ च्या उपकलम (२) अन्वये नगरपरिषदेची स्थापना करण्यात येते. वर्ष २०११ पासून ५०% जागा या महिलांकरिता राखीव ठेवण्यात येतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ. संजय भास्कर तायडे, ग्रामीण विकास विभाग, श्री.स.ह.केळकर महाविद्यालय, देवगड जि.सिंधुदुर्ग*

**How to cite this article:**
*तायडे, . संजय . भास्कर . (2026). महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका निवडणुकीत महिलांना ५०% आरक्षण एक सामाजिक न्याय. Journal of Research & Development, 18(1(A)), 150–152.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18617953*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18617953
OPEN ACCESS

आरक्षित जागांमध्ये अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती यांच्याकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात तर इतर मागासवर्गीयांकरिता २७% जागा राखीव ठेवण्यात येतात. महाराष्ट्र शासनाला राज्यातील कोणतेही स्थानिक क्षेत्र म्हणून राजपत्रातील अधिसूचनेने नागरी क्षेत्र घोषित करण्याचा अधिकार आहे.

नगरपंचायत :- ग्रामीण व शहरी संक्रमण अवस्थेतील भाग म्हणजे नगरपंचायत होय.

नगरपरिषद :- २५००० लोकसंख्येला नगरपरिषद स्थापन करता येते.

महाराष्ट्र राज्यात नगरपरिषदेचे लोकसंख्येच्या आधारावर तीन गटात वर्गीकरण केले आहे.

**अभ्यास क्षेत्र**

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासाकरिता अभ्यास क्षेत्र म्हणून संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील नगरपंचायत व नगरपरिषदा नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या निवडणुकांच्या अनुषंगाने यात किती अनुसूचित जाती जमातींच्या पुरुष व महिला आहेत यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) वर्तमान स्थितीमध्ये नगरपंचायत/नगरपरिषदेत पुरुष व महिलांचा सहभाग किती आहे.
२) नगरपंचायत/नगरपरिषदेत महिलांची भूमिका समजून घेणे.
३) अनुसूचित जाती/जमाती/इतर मागास वर्ग यांच्यातील नेतृत्वाचा अभ्यास करणे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित माहिती संकलित केली आहे. दुय्यम साधन सामग्रीमध्ये प्रकाशित अहवाल, संदर्भ पुस्तके, लेख, नियतकालिके, वेब जाळे इत्यादी संदर्भ साहित्याचा वापर केला आहे.

**चर्चा व विश्लेषण**

महाराष्ट्र राज्यात आधुनिकीकरण व औद्योगिकरण यामुळे शहरीकरणाचा वेग प्रचंड आहे. महाराष्ट्र राज्यात शहरीकरणाचे प्रमाण ४०% आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा ह्या सतत वाढत आहेत. रस्ते, वीज, आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा ह्या गरजांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत आदी स्वशासन संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रात महानगरपालिका आणि नगरपरिषदा अधिनियम १९९४ अंमलात आला. भारतीय संविधानाच्या २४३-थ च्या उपकलम (२) अन्वये जारी करण्यात आला आहे.

नगरपरिषद ही लोकप्रतिनिधींची सभा असते. नगरपरिषदेच्या लोकसंख्येनुसार निर्वाचितांची सदस्यसंख्या निर्धारित करण्यात येते. नगरपरिषदांमध्ये १७ ते ६५ निर्वाचित सदस्य असतात. शहरांचे विभाजन अनेक प्रभागांमध्ये केले जाते. प्रत्येक प्रभागामधून ३ किंवा अधिक सदस्यांची निवड केली जाते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची तरतूद केली आहे. इतर मागासवर्गीय सदस्यांना २७% जागा या आरक्षित ठेवल्या जातात. नगरपरिषदेचा कार्यकाळ ५ वर्षाचा असतो.

नगराध्यक्षाची निवड ही मतदारांकडून प्रत्यक्ष मतदानाने केली जाते. नगराध्यक्ष पद हे चक्राकार पध्दतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, महिला यांच्याकरिता राखीव ठेवले जाते. नगरसेवकांमधून उपनगराध्यक्षांची निवड केली जाते. नगराध्यक्ष हा त्या शहराचा प्रथम नागरिक असतो. लोकसंख्येच्या आधारावर अ,ब,क या वर्गात नगरपालिकांचे विभाजन केले जाते.

**नगरपरिषदांचे वर्गीकरण व सदस्य संख्या**

| अ.क्र. | लोकसंख्या | नगरपरिषद | नगरपरिषद सदस्य |
|---|---|---|---|
| १ | १ लाखांहून अधिक | अ वर्ग | ३८ सदस्य |
| २ | ४० हजार ते १ लाख | ब वर्ग | २३ सदस्य |
| ३ | २५ हजार ते ४० हजार | क वर्ग | १७ सदस्य |

**नगरपरिषद सदस्यांचे प्रकार**

नगरपरिषदेत दोन प्रकारचे सदस्य असतात.

**१) निर्वाचित सदस्य –** नगरपरिषद क्षेत्रातील नोंदणीकृत मतदारांमार्फत प्रत्यक्ष निवडून दिलेल्या सदस्यांचा यात समावेश होतो.

**२) नामनिर्देशित सदस्य –** नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती राज्य शासनामार्फत केली जाते.

महाराष्ट्र राज्यात एकूण ६ विभाग आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण २८८ नगरपरिषद/ नगरपंचायत आहेत. नगरपरिषद / नगरपंचायतीतील सदस्य संख्या ६८५९ आहेत.

महाराष्ट्र राज्यात एकूण २९ महानगरपालिका आहेत व एकूण जागा २८६९ आहेत.

महाराष्ट्र राज्याचा विचार करता महाराष्ट्रात एकूण २५९ नगरपंचायती व नगरपरिषद आहेत. एकूण जागा ६८५९ आहेत. महिलांकरिता राखीव जागा ३४२९ आहेत यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग घटकांना आरक्षित जागा आहेत.

महाराष्ट्र राज्यातील नगरपंचायत / नगरपरिषद यात असलेल्या राखीव प्रवर्गाची माहिती खालीलप्रमाणे.

वर्ष २०२५ मध्ये असलेली संख्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

| अ.क्र | एकूण जागा | सामान्य पुरुष | महिला राखीव | अनु जाती पुरुष | अनु जाती स्त्रिया | अनु जमाती पुरुष | अनु जमाती स्त्रिया | इतर मागास पुरुष | इतर मागास स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३९९० | १९९५ | १९९५ | ८९५ | ४९८ | ३३९ | १८७ | ५३४ | ५३५ |

**निष्कर्ष**

१) नगरपरिषद / नगरपंचायतीत ५०% जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यात आल्या आहेत.
२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात १३% व ७% तसेच इतर मागासवर्गीयांसाठी २७% जागा राखीव आहेत.
३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिला सबलीकरण होण्यास मदत झाली आहे.
४) शहरातील विकासात राजकीय सहभाग वाढला आहे.
५) नगरपरिषद / नगरपंचायतीतील पायाभूत सोयीसुविधा वाढण्यास मदत झाली आहे.
६) समाजातील विविध घटकातील महिलांना नगरपरिषद / नगरपंचायतीतील सहभाग मिळाला.

**संदर्भ ग्रंथ**

वरील शोधनिबंधांकरिता खालील ग्रंथांची मदत झाली.


| अनु क्र. | लेखकाचे नाव | पुस्तकाचे नाव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १ | तुकाराम जाधव, महेश शिरपुरकर | मानवी हक्क | युनिक अॅकॅडमी |
| २ | डॉ.वा.भा.पाटील | महाराष्ट्र शासन | प्रशांत पब्लिकेशन |
| ३ | डॉ.आनंद पाटील | सामान्य क्षमता चाचणी | |
| ४ | कपिल हांडे, राहुल पाटील | अत्यावश्यक राज्यशास्त्र नागरिकशास्त्र व अर्थशास्त्र | |
| ५ | वेबसाईट | www.maharashtraelectioncommission | |